एम.जे.सी. क्र. ६१/२०२५
वैशाली विरुध्द निरंक
निशाणी क्र. ९ च्या पुढे

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०१ वैशाली प्रशांत साबळे यांचा सरतपास शपथेवर श्री. ए. जे. मुलमुले वकीलांमार्फत सुरु.**

५. माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते **नि.क्र.९** कडे आहे.

६. मी माझ्या पुराव्यामध्ये माझे प्रती प्रशांत पंढरी साबळे यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रत अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली. त्यास **नि. क्र. १२** देण्यात येते. मी माझे, माझी मुलगी व सासू यांच्या आधार कार्डच्या प्रती अपलोड केल्या आहेत. त्याचा मुळ प्रती मी न्यायालयासमक्ष हजर केल्या. त्यास अनु. **नि. क्र. १३ ते १५** देण्यात येते. मी माझे राशन कार्डची प्रत अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली. त्यास **नि. क्र. १६** देण्यात येते. मी माझे पती प्रशांत साबळे यांच्या आधार कार्डची प्रत अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली. त्यास **नि. क्र. १७** देण्यात येते. मी मौजा भेंडाळा येथील शेत सर्वे क्र. १६७ याच्या ७/१२ उता-याची प्रमाणीत प्रत अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली आहे. त्यास **नि. क्र. १८** देण्यात येते. मी माझ्या मुलीच्या जन्माच्या दाखल्याची प्रत अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली आहे. त्यास **नि. क्र. १९** देण्यात येते. मी 'दैनिक तरुण भारत' वृत्तपत्रामध्ये पब्लीक नोटिस दिनांक ०५.११.२०२५ रोजी दिलेली आहे. ती अभिलेखावर अपलोड केली आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते.

**सदरचा अर्ज हा कोणत्याही पक्षकाराच्या विरोधात दाखल न केल्याने उलटतपास व फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE

Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.02.07 16:45:57 +0530

दिनांक – ०७.०२.२०२६. (एस. एम. गाडे)

सावनेर. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

सावनेर, जि. नागपूर.